## विषय : संस्थेचे कर्जविषयक नियम

सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांचेकडून जारी परिपत्रकातील तरतूदीनुसार, सभासदांच्या कर्जमर्यादेत वाढ करण्यासाठी संस्थेकडे उपलब्ध निधी (Cost of Fund), सभासदांचे वेतनमान, कर्ज परतफेड क्षमता इत्यादी बाबींचा विचार करून, संस्थेने दि.११.०८.२०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापकीय समितीच्या सभेतील विषय व मंजुर ठरावान्वये सर्वसाधारण कर्जाच्या कमाल मर्यादेत वाढ केली असून त्यावाबतचे नियम खालीलप्रमाणे –

**कर्जविषयक नियम व इतर नियम खालीलप्रमाणे :-**

- सर्वसाधारण कर्जाची कमाल मर्यादा रू.५,००,००० असेल.
- सदरील कर्जावर द.सा.द.शे. ७ % दराने व्याज आकारले जाईल.
- कर्ज परतफेडीची कमाल मुदत ८४ महिने राहील. परतफेडीचा कालावधी १२–२४–३६–४८–६०–७२–८४ महिने अशा पदधतीने ठरवून देता येतील. (सेवा कालावधीच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून)
- कर्ज परतफेडीची मुदत सेवाकालावधी विचारात घेवून ठरविला जाईल.
- नवीन सभासदास १ वर्ष पुर्ण झाल्यानंतरच कर्ज मागणी अर्ज सादर करता येईल.
- कंपनी आस्थापनेत सलग ५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा झालेले सभासद सदरचे कर्ज घेण्यास पात्र राहतील.
- सदरच्या कर्जास पात्र ठरण्यासाठी कर्ज घेणा–या सभासदाची लगतच्या ६ महिन्याची मासिक वर्गणी रू.२००० असणे आवश्यक राहील.
- कर्जास पात्र ठरण्यासाठी मागणी कर्जाच्या १०% एवढी रक्कम सभासदाच्या शेअर्स खाती जमा असणे आवश्यक राहील.
- उपविधीप्रमाणे मंजुर कर्ज रकमेतून १०% रक्कम वजावट करून शेअर्स खाती जमा केली जाईल. शेअर्स रक्कम रू.२ लाख पुर्ण झाल्यास अशा वजावटीची रक्कम सभासदाच्या संचित ठेव खाती जमा करण्यात येईल. संचित ठेवीवर वार्षिक पद्धतीने व्याज अदा करण्यात येईल.
- रू.३ लाखावरील कर्जे टॉप–अप करता येणार नाही.
- मागील कर्ज रक्कमेची ५०% अथवा त्यापेक्षा जादा रकमेची परतफेड झाल्यानंतर सभासदास नवीन कर्जासाठी अर्ज करता येईल. (उदा.कर्ज रू.१ लाख घेतले असल्यास या कर्जाची बाकी रू.५० हजार व त्यापेक्षा कमी शिल्लक राहीली असल्यास) (सदरची सुविधा केवळ रू.३ लाखा पर्यंतच्या कर्जास लागू राहील.)
- नवीन कर्ज मागणी अर्जांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

- कमीत कमी दोन सभासदांच्या वैयक्तिक जामिनकीवर कर्ज दिले जाईल मात्र एका सभासदांस दोनपेक्षा अधिक कर्जदारास जामीन राहता येणार नाही.
- कर्ज घेणा-या सभासदांनी शक्यतो तीन-तीन सभासदांचे समूह (गुप) बनवावेत म्हणजे जामीनदार शोधण्यास अडचण येणार नाही.

  (उदा.समजा अ-ब-क हे तीन सभासद असतील तर अ च्या कर्जास ब-क जामीन राहतील, ब च्या कर्जास क-अ जामीन राहतील, क च्या कर्जास अ-ब जामीन राहतील.) (गुप बाहेरील सभासदांस अ-ब-क यांनी जामीन राहू नये.)
- ज्या सभासदांची संस्थेने ठरविलेल्याप्रमाणे संस्थेस येणे रक्कम नियमीतपणे येत नसेल तर त्या सभासदास कर्ज मागण्याचा अधिकार राहणार नाही.
- कर्जाचा अर्ज सुवाच्छ अक्षरात भरलेला असावा त्यामध्ये खाडाखोड नसावी.
- कर्जाच्या करारपत्रावर/कर्जरोख्यावर रेव्हेन्यु स्टॅम्प (महसूली तिकीट) चिटकवून कर्जदार तसेच जामीनदार यांच्या सहया असणे आवश्यक राहील.
- कर्ज प्रकरणास फोटो तसेच पगारपावती,आधार कार्ड, पॅनकार्ड ची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक राहील.
- जामीनदार सभासदांची मासिक वर्गणी किमान रू.१000 कपात केली जाईल (ऐच्छिक वाढ करता येईल)
- सभासदत्त्व बंद केल्यानंतर त्या सभासदास सहा महिन्यानंतर पुन्हा संस्थेचे सभासदत्त्व घेता येईल.
- सदरचे कर्ज व कर्जविषयक नियम दि.११.०८.२०२३ पासून लागू होतील.

  कर्ज मिळणेबाबत काही अडचण असल्यास सोसायटीच्या संचालकांशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संजय खैरनार | अध्यक्ष |
| रविंद्र खवळे | उपाध्यक्ष |
| दत्तात्रय पाटील | खजिनदार |
| सुधीर दिवाणजी | सचिव |
| महेश पिंगळे | संचालक |
| मलिकार्जुन दोडडीमनी | संचालक |
| ईश्वर कुंभार | संचालक |
| शामराव वळकुंदे | संचालक |
| सत्यम वाडेकर | संचालक |
| सौ.राजश्री पाटील | संचालिका |